निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७६ वा.
बुधवार :१० डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## नागपूर ते चंद्रपूर द्रुतगती महामार्गाच्या सुधारित आखणीस मान्यता - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर**/ चंद्रपूर शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग अंतर्गत केंद्र सरकारच्या गतीशक्ती पोर्टलकडून प्राप्त सूचनांचा विचार करून एकूण २०४ किलोमीटर लांबीच्या सुधारित रस्ता आखणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मुंबई शहरातील घाटकोपर पूर्व, चेंबूर आणि अंधेरी (प.) आंबिवली मुद्रण कामगार नगर व चुनाभट्टी येथील भूखंडांचा खासगीकरणाच्या माध्यमातून विकासाच्या मुदतवाढीस देखील आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.



बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागरीकरणाचा वेग वाढता असल्यामुळे शहरांमध्ये निर्माण होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यास शासनाचे प्राधान्य आहे. पुणे जिल्ह्यातील हडपसर ते यवत मार्गावर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात याव्यात. मात्र हे करताना नागरिकांना कुठलीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. या मार्गावर रस्त्याची सुधारणा करण्यात येऊन उन्नत महामार्ग बांधण्यात यावा. भैरोबा नाल्याजवळील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यक व तातडीच्या उपाययोजना कराव्यात.

राज्यात सुरू असलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प तसेच प्रस्तावित प्रकल्पांना गती शक्ती पोर्टलकडून मान्यता घ्यावी. प्रत्येक प्रकल्प गतिशक्ती पोर्टलकडून मान्यता आल्यानंतरच समितीच्या बैठकीसमोर यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी बैठकीत सादरीकरण केले. बैठकीस अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, प्रधान सचिव (विधी व न्याय) सुवर्णा केवले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.

सुधारित आखणीनंतर नागपूर ते चंद्रपूर द्रुतगती महामार्गातील बदल

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील सेलडोह इंटरचेंज ते दुर्ग हैदराबाद महामार्गावरील नवेगाव (मोर)पर्यंत महामार्ग बांधण्यात येणार आहे. याची लांबी १९२ किलोमीटर असणार आहे. तसेच ११ किलोमीटर लांबीचा चंद्रपूर जोड रस्ता पूर्वीच्या आखणीनुसार कायम ठेवण्यात आला आहे. अशा एकूण २०४ किलोमीटर लांबीच्या सुधारित रस्ता आखणीस मान्यता देण्यात आली आहे. सुधारित रस्ता आखणीमुळे २७ हेक्टर वन क्षेत्र संपादनात बचत होणार आहे.

### ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार; उपमुख्यमंत्र्यांकडून पार्थिवाचे अंत्यदर्शन

## डॉ. बाबा आढाव यांचे संपूर्ण आयुष्य कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित वर्गाकरिता समर्पित - उपमुख्यमंत्री अजित पवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे प्रतिनिधी**/ ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमी, नवी पेठ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शासनाच्यावतीने उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले; पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



यावेळी माजी गृहमंत्री मंत्री अनिल देशमुख, माजी राज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार मोहन जोशी, चेतन तुपे, पोलीस उपायुक्त कृषिकेष रावले, उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी, पुणे शहर तहसीलदार स्मिता माने, हवेली तहसीलदार अर्चना निकम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, डॉ. बाबा आढाव यांनी खऱ्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित आदी वर्गाकरिता संपूर्ण आयुष्य समर्पित केले. रिक्षा पंचायत, हमाल पंचायत, माथाडी, असंघटित कामगारांच्या प्रसंगात त्यांना कठोर भूमिका घ्यावी लागली. ते विचार घेऊन ते शेवटच्या श्वासापर्यंत आयुष्य जगले. छत्रपती शिवराजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा स्मरणात ठेवून त्यादृष्टीने वाटचाल केली, एक संघर्ष योद्धा म्हणून त्यांना भारतासह महाराष्ट्राने अनुभवले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री पवार यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी यांनी डॉ. बाबा आढाव यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यांच्या पत्नी शीलाताई आढाव, मुलगा असीम आढाव, अंबर आढाव आदी यावेळी उपस्थित होते.

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची देवलापार गो-विज्ञान संशोधन केंद्रास भेट



**नागपूर**/ राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज देवलापार येथील गो-विज्ञान संशोधन केंद्रास भेट दिली. यावेळी गो विज्ञान केंद्राच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, गो-विज्ञान संशोधन केंद्राचे अध्यक्ष पद्मेश गुप्ता, कोषाध्यक्ष हितेंद्र चोपकर आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल देवव्रत यांनी येथील कामधेनू पंचगव्य आयुर्वेद भवनची पाहणी केली. अवलेह विभाग, वटी, तेल, इंधन, सिरप, प्रयोगशाळा आदींना भेट दिली. येथे निर्माण होणारे फलघृत, हिंग्वाद्यघृत, अष्टमंगलघृत, गांडूळ खत निर्मिती प्रक्रिया, गोमूत्र अर्क, दंतमंजन आदी ३० पेक्षा जास्त उत्पादनांची माहितीही त्यांनी घेतली. यावेळी संशोधन केंद्राच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

रामटेक तालुक्यातील देवलापार येथील गोविज्ञान संशोधन केंद्राने देशी गोवंशाचा विकास हे प्रमुख उद्दिष्ट ठेवले आहे. दुधाएवढेच शेण आणि गोमूत्र हे घटकही महत्त्वाचे असून ते उत्पन्नाचा भक्कम पर्याय ठरू शकतात हेच संस्थेने विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीतून सिध्द केले आहे. त्याच दृष्टीने देशपातळीवरील संस्थांशी तंत्रज्ञानाबाबत करार करून विविध उत्पादने तयार केली आहेत. काही उत्पादनांना आंतरराष्ट्रीय पेटंटही मिळवण्यात संस्था यशस्वी ठरली आहे.

## २०२६ साठी २४ दिवसांच्या सार्वजनिक सुट्ट्या जाहीर; 'भाऊबीजे'ला अतिरिक्त सुट्टी

**मुंबई** / महाराष्ट्र शासनाने २०२६ या वर्षासाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांसाठी २४ सार्वजनिक सुट्ट्या जाहीर केल्या असून, भाऊबीज (११ नोव्हेंबर २०२६, बुधवार) यादिवशी अतिरिक्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे, सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली आहे.

जाहीर केलेल्या सुट्ट्यांमध्ये प्रमुख सण आणि राष्ट्रीय दिवसांचा समावेश आहे. या सुट्या महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालये, राज्य शासनाचे उपक्रम, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांना लागू राहील.

याशिवाय १ एप्रिल २०२६ (बुधवार) हा दिवस केवळ बँकांसाठी वार्षिक लेखापरीक्षणासाठी सुट्टी म्हणून जाहीर करण्यात आला आहे.

## 'आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' एकत्रित लागू केल्याने उपचारांची गुणवत्ता सुधारली

**मुंबई**/ राज्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' या दोन्ही योजना एकत्रित करून जानेवारी २०२५ पासून महत्त्वपूर्ण सुधारणा लागू केल्या आहेत, अशी माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब चव्हाण यांनी दिली.

रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ पर्यंत वाढविण्यात आली असून उपचारांच्या दरात वाढ तसेच पेमेंट प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. उपचारांची गुणवत्ता वाढविण्यासाठी एनएबीएच आणि एनक्यूएएस प्रमाणित रुग्णालयांना दावा रक्कमेतून प्रति उपचार १० ते १५ टक्के प्रोत्साहन रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि तक्रार निवारणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती' तसेच पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 'जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणी' गठीत करण्यात आली आहे. नागरिकांना योजनांविषयी माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी २४ तास कार्यरत टोल-फ्री कॉल सेंटर सेवा सुरू करण्यात आली असून. नागरिक या क्रमांकांवर संपर्क साधू शकतात - १५५३८८ / १८००२३३२२००, १४५५५ / १८००१११५६५

प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात दर्शनी भागात योजना कक्ष (किऑस्क) स्थापन करणे बंधनकारक असून या कक्षात नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी 'आरोग्यमित्र' नियुक्त करण्यात आले आहेत. उपचार व सुविधा मिळण्यात अडचण आल्यास तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याची जबाबदारी जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय व्यवस्थापक, अंमलबजावणी सहाय्य संस्था आणि जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.

त्यांच्या संपर्क क्रमांकांची माहिती प्रत्येक रुग्णालयात स्पष्टपणे प्रदर्शित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्य शासनाचे हे पाऊल नागरिकांना दर्जेदार, वेळेवर आणि पूर्णपणे कॅशलेस आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अंगीकृत रुग्णालयांनी रुग्णांची विनाविलंब नोंदणी करून कॅशलेस उपचार द्यावेत. अशा पॅकेजमध्ये शस्त्रक्रिया, तपासण्या, योग्य दर्जाचे प्रत्यारोपण, औषधे, जेवण आणि एक वेळचा प्रवास खर्च यांचा समावेश असून कोणतेही शुल्क आकारता कामा नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

योजनेत समाविष्ट उपचार नाकारणे किंवा रुग्णांकडून रक्कम मागणे अशा तक्रारी आल्यास चौकशीनंतर संबंधित रुग्णालयावर दंड, निलंबन किंवा अंगीकरण रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

राज्यातील सर्व नागरिक या एकत्रित योजनेतर्गत उपचारांसाठी पात्र आहेत. नागरिकांनी योजनांबाबत जागरूक राहून आपले हक्क बजावावेत आणि कोणत्याही अडचणीसाठी आरोग्यमित्र, जिल्हास्तरीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या समिती किंवा राज्य आरोग्य हमी सोसायटीशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

## पालिका निवडणुकीआधीच महायुती फुटणार? भाजप-शिवसेनेच्या गट्टीनंतर राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी?

**मुंबई**/ नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर आता पालिका निवडणुकीची रणधुमाळी लवकरच सुरू होणार आहे. मुंबई पालिकेवर झेंडा फडकवण्यासाठी महायुतीकडून जोरदार तयारी सुरू आहे. मात्र, मुंबई निवडणुकीच्या मैदानात भाजप शिवसेनेला सोबत घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. तर अजित पवारांना मुंबईत सोबत न घेण्यावर भाजप ठाम असल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे. भाजपच्या या निर्णयामागचं नेमकं कारण काय आहे. याबद्दल सविस्तर जाणून घ्या.




राज्यात लवकरच महानगरपालिका निवडणुकींचं बिगुल वाजणार आहे. मुंबई पालिका निवडणुकीसाठी भाजपनं रणनीती आखलीय, मुंबईत भाजप आणि शिवसेना एकत्र निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची माहिती आहे.तर दादांच्या राष्ट्रवादीला सोबत न घेण्यावर भाजप ठाम असल्याची माहितीही सूत्रांनी दिलीय, अधिवेशनानंतर मुंबईतील जागावाटपावर चर्चा होणार असून दोन्ही पक्षांकडून प्रत्येकी २ असे एकूण चार नेते वाटाघाटीत सहभागी होणार असल्याची चर्चा आहे.

राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी?

हिंदुत्व आणि विकासाच्या मुद्द्यावर भाजप-शिवसेना एकत्र निवडणूक लढणार आहेत. नवाब मलिक यांच्यामुळे राष्ट्रवादीला सोबत घेण्यास भाजपचा विरोध? असल्याची चर्चा आहे. दरम्यान सोमवारी मुख्यमंत्री फडणवीस, एकनाथ शिंदेंमध्ये जागावाटपावर चर्चा झाल्याची सूत्रांची माहिती

नवाब मलिकांवर दाऊद इब्राहिमशी संबंध असल्याचे आरोप असल्यामुळे भाजपचा त्यांना विरोध आहे. नवाब मलिकांबाबतची भाजपची भूमिका अजित पवारांपर्यंत पोहोचवल्याची माहितीही प्रसाद लाड यांनी दिलीय. त्यामुळे मलिक कुटुंब सोडून इतर कुणी युती करण्यासाठी तयार असेल

तर आम्ही करू अशी रोखठोक भूमिका भाजपनं मांडलीय.

भाजपनं नवाब मलिकांच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादीला अडचणीत टाकल्याचं दिसतंय. तर दुसरीकडे शिवसेनेनं मात्र मुंबई आणि राज्यातील इतर पालिका निवडणुका महायुती म्हणूनच लढणार असल्याचं स्पष्ट केलंय.

अनेक वर्षांपासून मुंबई पालिकेवर शिवसेनेची सत्ता आहे. शिवसेनेची सत्ता उलथवून लावण्यासाठी भाजपकडून खास प्लॅन तयार करण्यात आलाय. पालिका निवडणूक युतीमध्ये लढायची कि स्वतंत्र यावर महायुतीमधून अधिकृतपणे कोणतीही घोषणा झालेली नाही.. मात्र, मुंबईत दादांच्या राष्ट्रवादीला सोबत न घेण्याची भाजपची भूमिका असल्याची माहिती आहे. त्यामुळे राष्ट्रवादीला सोडून भाजप आणि शिवसेना एकत्र निवडणूक लढल्यास त्याचा फायदा महायुतीला किती होणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# असंघटित कामगारांचा आधारवड हरपला

असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्य झिजवणारे ज्येष्ठ कामगार नेते, पुरोगामी चळवळीचे आधारवड व वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे सोमवारी (८ डिसेंबर) वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. कष्टकरी व श्रमजीवी वर्गासाठी झटणाऱ्या या थोर नेत्याच्या निधनाने संपूर्ण समाजाचे मोठे नुकसान झाले आहे.

**सामाजिक कार्याची प्रेरणादायी सुरुवात**

१ जून १९३० रोजी पुण्यात जन्मलेले बाबा आढाव हे नाना पेठेतील एक नामांकित आयुर्वेदिक डॉक्टर होते. समाजवादी विचारांचा प्रभाव मनावर पडल्याने त्यांनी केवळ वयाच्या २३ व्या वर्षीच समाजवादाकडे वाटचाल सुरू केली. १९५३ पासून १९७० पर्यंत त्यांनी समाजवादी पक्षात राहून अनेक आंदोलनांचे नेतृत्व केले. ते पुण्याचे नगरसेवकही होते.

**कामगार चळवळीची ठिणगी**

नाना पेठ परिसरातील हमाल व इतर कामगारांवरील शोषण पाहून त्यांच्या मनात असंघटित कामगारांसाठी काहीतरी करण्याची ज्वाला निर्माण झाली. अखेर १९६६ मध्ये त्यांनी आपला डॉक्टरकी व्यवसाय सोडून संपूर्ण वेळ समाजकार्यास वाहिला.

**अस संघटित कामगारांसाठी आजीवन लढा**

१९७० नंतर त्यांनी पक्षीय राजकारणापासून दूर होत असंघटित कामगारांच्या न्यायहक्कांसाठी आयुष्य अर्पण केले. समाजातील नाकारलेले, उपेक्षित घटक मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विविध संघटनांची उभारणी केली–

हमाल पंचायत
रिक्षा पंचायत
मोलकरीण पंचायत
कागद–पत्रा–काच वेचक कष्टकरी पंचायत
पथारी व्यावसायिक पंचायत
टेम्पो पंचायत

या संघटनांच्या माध्यमातून हजारो कामगारांना सामाजिक सुरक्षा, सन्मान आणि न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

**'हमाल पंचायत'–महत्त्वाचा टप्पा**

पुण्यातून सुरू झालेली हमाल पंचायत ही चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात पसरली. असंघटित कामगारांच्या जीवनात बदल घडवणारी ही ऐतिहासिक चळवळ ठरली.

एक गाव एक पाणवठा–समता चळवळीचा दीपस्तंभ

जातीय भेदभावाविरुद्ध उभ्या राहणाऱ्या 'एक गाव एक पाणवठा' या क्रांतिकारी उपक्रमाचेही नेतृत्व त्यांनी धैर्याने केले. समाजात समता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत चालू ठेवले.

**कामगार नेतृत्वाची वैशिष्ट्ये**

**बाबा आढाव यांच्या नेतृत्वाची काही ठळक वैशिष्ट्ये–**

* शोषित–वंचितांसाठी सातत्याने संघर्षाची भूमिका
* शासनाकडे आर्थिक मागण्या न करता सहकारी संस्थांद्वारे सामाजिक सुरक्षिततेचा मार्ग
* प्रबोधनप्रधान कार्यपद्धती
* संशोधन संस्थांच्या मदतीने चळवळीला बळ
* पक्षीय राजकारणापासून दूर राहूनही महत्वपूर्ण राजकीय भूमिका घेण्याचे धाडस

त्यांचा संघर्ष आणि प्रबोधनाचा दुहेरी मार्ग हा पुरोगामी राजकारणाचा जिवंत दस्तऐवज ठरतो.

**एक युग संपले**

महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील जवळपास पाच दशकांचा प्रवास घडविणारा हा अढळ तारा आता निखळला आहे. असंघटित कामगारांचा खरा आधारवड हरपला आहे. डॉ. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# कलाल-कलार समाजासाठीआर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यास सरकार सक्षम नसेल तर, आम्हाला स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी-रमेश लांजेवार

कलाल–कलार समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा प्रश्न आता अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचला असून, जर राज्य सरकार या मागणीवर ठोस आणि तात्काळ निर्णय घेऊ शकत नसेल, तर आम्हाला स्वेच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी कळकळीची मागणी महाराष्ट्र कलाल–कलार समाज संघटनेतर्फे सरकारसमोर मांडण्यात येत आहे , असे संघटनेचे राज्य प्रवक्ते रमेश लांजेवार यांनी जाहीर केले.

राज्यातील विविध समाजांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आतापर्यंत अनेक आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत. त्या निर्णयांचे स्वागत कलाल–कलार समाजानेही मनापासून केले. मात्र *चार वर्षांहून अधिक काळापासून* भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कलाल–कलार समाजाची सातत्यपूर्ण, शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने सुरू असलेली लढाई आजही निर्णयशून्य आहे.

या मागणीसंदर्भात सरकारची भूमिका ' तारीख पे तारीख ' अशीच राहिली असून, समाजाला वारंवार आश्वासने देऊन दिशाभूल केली जात आहे, असा आरोप संघटनेने केला आहे. आंदोलन, मोर्चे, निवेदने, लिखित व इलेक्ट्रॉनिक पाठपुरावे, विविध मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकांत मिळालेले आश्वासन या सर्व प्रयत्नांवर सरकारकडून ठोस कारवाई न दिसणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

**चार वर्षांतील समाजाचे प्रमुख प्रयत्न**

२०२२ मध्ये नागपूर विधानसभेवर ऐतिहासिक मोर्चा

२०२३ मध्ये दुसरा भव्य मोर्चा नागपूर विधानसभेवर

७ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईतील आझाद मैदानात राज्यस्तरीय मोठे आंदोलन

संबंधित मंत्री, मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना वेळोवेळी दिलेली १००–१५० पेक्षा अधिक निवेदने आणि लिखित पाठपुरावा

ईमेल, टपाल आणि माध्यमांतून सतत जनजागृती व मागण्यांची मांडणी

अनेक वर्तमानपत्रांत आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजाच्या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा

या सर्व कृतीतून समाजाची प्रामाणिकता, संयम आणि लोकशाही मार्गाने लढा देण्याची वृत्ती स्पष्टपणे दिसून येते. परंतु सरकारची निष्क्रियता व ढिलाई समाजाच्या भावना अधिकच दुखावते आहे.

**समाजाच्या प्रमुख मागण्या**

१. भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ तात्काळ स्थापन करणे.

२. विश्वकर्मा योजनेअंतर्गत पारंपरिक मद्य व्यवसायाचा हक्क समाजाला प्रदान करणे.

३. समाजातील युवकांना रोजगारनिर्मितीची संधी, आर्थिक स्वावलंबन व व्यवसायविकासासाठी शासकीय पाठिंबा मिळवून देणे.

कलाल–कलार समाजाने संघर्ष केला नाही, आंदोलने केली नाहीत तरीही इतर काही समाजांना सरकारने विकास महामंडळे प्रदान केली आहेत. मग *चार वर्षांपासून सातत्यपूर्ण संघर्ष करणाऱ्या* या समाजाच्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष का केले, असा गंभीर प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे.

लोकप्रतिनिधींना थेट आवाहन

हिवाळी अधिवेशनात उपस्थित सर्व सन्माननीय पक्ष–विपक्ष आमदार, मंत्री, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना संघटनेतर्फे आवाहन करण्यात आले आहे की:

**कलाल–कलार समाजावर होणारा अन्याय आता थांबवावा. समाजाच्या व्यथा ऐका, परिस्थितीची गंभीरता ओळखा आणि तात्काळ न्याय्य निर्णय घ्या.

या संघर्षाचा उद्देश केवळ महामंडळ स्थापन करणे नसून, समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक व सामाजिक विकासासाठी दीर्घकालीन मार्ग मोकळा करणे हा आहे.

सरकारने या मागणीवर निर्णय न घेतल्यास समाजाच्या मनातील उद्विग्नता, अपेक्षाभंग आणि प्रचंड मानसिक ताण लक्षात घेता, आम्हाला स्वेच्छामरणाची परवानगी द्यावी , अशी अत्यंत टोकाची परंतु गंभीरतेने घेण्यासारखी मागणी संघटनेने केली आहे.

**आपला हितचिंतक**
**रमेश लांजेवार**
**राज्य प्रवक्ता, महाराष्ट्र कलाल–कलार समाज संघटना , नागपूर.**

# 'बारोमास' - शेतकऱ्याचे अखंड दुःखगीत

शेती ही फक्त एक व्यवसायप्रणाली नसून ग्रामीण जीवनाची संस्कृती, परंपरा, मानसिकता आणि जगण्याची गुरुकिल्ली आहे. पण हेच जगणे बाराही महिने संकटांनी वेढलेले असते–याच शोकांतिकेचा रक्तरंजित आरसा म्हणजे 'बारोमास'.

कादंबरीचा नायक एकनाथ – उच्चशिक्षित, शहाणा, कर्तबगार – पण हातात ओळख नाही, पैसा नाही, डोनेशन देण्याची ताकद नाही म्हणून नोकरी मिळत नाही. शिक्षणाच्या शिखरावर उभा असलेला तरुण घरच्या शेतात मातीशी मिसळत काम करायला भाग पडतो कारण शहराच्या नोकरीचे दरवाजे गरीबांसाठी बंदच असतात.

त्याची पत्नी अलका – शहरात वाढलेली, स्वप्नांनी भरलेली, सुशिक्षित – अचानक खेड्यातील कठीण वास्तवात फेकली जाते. सुरुवातीला तिने आणलेले स्वप्नांचे रंग हळूहळू फिके होतात. गरीबी, अवकाळी पाऊस, कर्ज, तुटपुंज्या उत्पन्नाची चिरडणारी साखळी आणि त्यात पिसून निघणारे नाते. शेवटी संसाराच्या नांदीलाच पूर्णविराम लागतो.

**कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती - संघर्षाची एक वेगळी कहाणी**

**सुभानराव - जिवापाड शेती करणारा बाप**

त्याचे जगणे शेतीतच. पण नापिकी, दुष्काळ, कर्ज, महाजन यांच्यात चिरडला गेलेला. जमिनीची गहाण ठेवूनही ती परत सोडवता न येण्याची जळजळ त्याला जिवंतपणी घाव देते, आणि अखेर वैफल्यातून तो जीवनाचा शेवट करतो. त्याचा मृत्यू हा केवळ एका माणसाचा नाही, तर एका पिढीच्या उध्वस्त स्वप्नांचा अंत आहे.

**शेवंतामाय - मातृत्वाने संसार ओढणारी आई**


रट्टे–घट्टे खात, प्रत्येक संकटाला अंगावर घेत, आपल्या लेकरांसाठी घर चालवणारी शेतकरी स्त्री. कधी कठोर तर कधी हतबल. पण तिची असहायता वाचताना कादंबरी घशात अडकते. मुलगा अटकेत गेला तरी तिची नजर दारात खिळून राहते.

**मधू - शिक्षित पण बेरोजगार**

नोकरीच्या प्रतीक्षेत आयुष्य झिजवतो. गुप्तधनाच्या शोधापासून ते दलालांना पैसे देण्यापर्यंत सर्व प्रयत्न करतो, पण प्रत्येक वेळी फसवणूक. शेवटी चोरीसारखा अतिरेकी मार्ग स्वीकारतो. हे केवळ एका व्यक्तीचे नव्हे, तर ग्रामीण बेरोजगारीचे क्रूर चित्र आहे.

**मंगल - बहीण**

तिच्या पतीने दुबार पेरणी आणि कर्जाच्या विवंचनेतून




आत्महत्या केली. तिचे आयुष्य एका क्षणात उद्ध्वस्त झाले. ही कथा हजारो विधवांचे अश्रू गोळा करून बांधली गेली आहे.

**चंद्री मांजर - प्रतीकात्मक पात्र**

कथेतले एक अत्यंत हृदयस्पर्शी पात्र. तिचे एकनाथशी असलेले भावबंध, तिच्या हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण, आणि तिचा झालेला अंत–हे सगळेच शेतकरी आयुष्याच्या असुरक्षिततेचे, तुटलेल्या नात्यांचे, आणि दुर्लक्षित भावनांचे प्रतीक आहे.

**शेतकऱ्याचा विरोधाभास - जमिनीचा मालक पण अन्नाचा भिकारी**

**कादंबरी एक मोठा प्रश्न विचारतेः**

भरपूर जमीन असणारा शेतकरी गरीब का?

आणि रोजंदारी करणारा मजूर निवांत का?

मुकुटरावसारखा शेतमजूर हाताशी रोख मजुरी घेऊन दिवस घालवतो.

पण जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला पाहुणे आले तरी साखर–पत्ती विकत घ्यावी लागते.

कारण–

* बियाणे महाग
* खते महाग
* औषधे महाग
* पिकांचा भाव तुटपुंजा
* पाऊस अविश्वसनीय
* कर्जे डोके वर काढणारी

**पेरले तर उगवत नाही, उगवले तर विकले जात नाही, विकले तर भाव नाही.**

या शोकांतिकेत शेतकऱ्याची स्वतःची ओळखच हरवते.

**संघर्षाची दोन पिढ्या**

एकनाथ – शिक्षित, स्वप्नाळू

सुभानराव – परंपरागत, मेहनती

या दोन पिढ्यांचा संघर्ष कादंबरीत अत्यंत वास्तवतेने उभा राहतो. शिक्षण असूनही 'काहीच बदलणार नाही' ही उद्विग्न जाणीव आणि परंपरा जपण्याचा वेदनादायी प्रयत्न दोन्ही समांतरपणे चालू राहतात.

**सामाजिक-आर्थिक प्रणालीवर तीक्ष्ण प्रहार**

'बारोमास' फक्त कथा सांगत नाही; ती संपूर्ण व्यवस्थेला हादरवते–

* लुटणारे व्यापारी
* सावकारांचे व्याजाचे शोषण
* निसर्गाची लहरी साथ
* भ्रष्ट राजकारण
* शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तोडगा काढण्यात अपयशी संघटना
* गावकुसातील असमानता व ठाकठिकाणी दुटप्पीपणा

ही कादंबरी सांगते की, शेतकऱ्याला दूधपाणी उपचार नकोत–त्याला शस्त्रक्रियाच हवी. म्हणजेच मोठे, निर्णायक आणि धोरणात्मक बदल.

**'बारोमास' - साहित्यिक मूल्य**

सदानंद देशमुखांचे लेखन हे अनुभवाचे, वेदनेचे, संघर्षाचे, क्रोधाचे आणि करुणेचे मिश्रण आहे.

त्यांनी–

**तहान**

**चारीमेरा**

यांसारख्या कादंबऱ्यांतही ग्रामीण समस्यांचे निखळ आणि ज्वलंत चित्रण केले आहे.

शेती, पाणीप्रश्न, सामाजिक विषमता, बेरोजगारी, आर्थिक गोंधळ–यांची त्यांनी खोलवर चिकित्सा केली आहे.

**शेवटी उरतो एकच प्रश्न**

आणखी किती अलका संसार मोडून काढतील?

आणखी किती सुभानराव आत्महत्येच्या दाराशी पोचतील?

आणखी किती एकनाथ शेतीतच अडकून पडतील?

आणि उत्तर काळजाला छेदते–

जोपर्यंत आपण सामूहिकपणे काही बदल घडवून आणत नाही, तोपर्यंत शेतकऱ्याचा 'बारोमास' कधीच संपणार नाही.

**मनापासून केलेली प्रार्थना**

कृषीप्रधान देशात शेतकरी सुखी नसेल तर कोणताही विकास टिकणार नाही.

या देशातील अन्नदात्याच्या अंगातील काटे काढणे हीच खरी समाजाची जबाबदारी आहे.

यापुढे तरी शेतकऱ्याच्या घरात 'बारोमास' नको.

सुखाचा, समाधानाचा आणि सुरक्षिततेचा 'पहिला पाऊस' पडू दे–हीच मनःपूर्वक प्रार्थना.

# पोलीस पाटील गुरुवारी नागपूरमध्ये काढणार मोर्चा; निवृत्ती वय ६५ वर्षांपर्यंत करण्यासह विविध मागण्या

**आत्ताच एक्सप्रेस खुलताबाद प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघटनेच्या आवाहनावरून ११ डिसेंबर रोजी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनावर विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. राज्याध्यक्ष शिवाजीराव कोलते पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा यशवंतराव स्टेडियम येथून सकाळी १० वाजता सुरू होईल. मोर्चा थेट विधानभवनावर दुपारी १२ वाजता धडक देणार आहे. राज्यभरातील हजारो पोलिस पाटील या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

खुलताबाद तालुक्यातील पोलीस पाटलांनी तहसीलदार स्वरूप कंकाळ व पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांना लेखी निवेदन दिले. नागपूर येथील मोर्चात सहभागी होणार असल्याचे त्यांनी कळवले. तालुक्यात ७३ गावे आहेत. त्यापैकी केवळ ५० गावांमध्येच पोलीस पाटील नियुक्त आहेत. उर्वरित गावे पोलिस पाटीलशिवाय चालत आहेत. त्यामुळे गावपातळीवरील कामकाज, कायदेशीर प्रक्रिया व शासनाच्या उपक्रमांवर परिणाम होत आहे. पोलिस पाटलांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. निवृत्ती वय ६० वरून ६५ वर्षांपर्यंत वाढवावे. पुनर्नियुक्तीची पद्धत रद्द करून सेवा सेवानिवृत्तीपर्यंत कायम ठेवावी. पोलीस पाटील व त्यांच्या कुटुंबीयांना मेडिक्लेम सुविधा द्यावी. प्रवास व दैनिक भत्ता वाढवावा. २०११ नंतर भत्त्यात वाढ झालेली नाही. २५ लाखांचा विमा उतरवावा. निवृत्तीनंतर मानधनाच्या ५० टक्के इतके निवृत्ती सन्मान मानधन मंजूर करावे. वेल्फेअर फंड स्थापन करावा. १६ ऑगस्ट २०२४ पूर्वी नियुक्त पोलिस पाटलांना लहान कुटुंबाची अट लागू करू नये. याशिवाय अनेक प्रलंबित मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत. शासनाने तत्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, यासाठी हा ऐतिहासिक मोर्चा आयोजित केला आहे. मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस पाटील संघटना तालुकाध्यक्ष, जनार्दन पाटील उबाळे, उपाध्यक्षा सिंधूताई बढे पाटील, सचिव रमेश ढिवरे पाटील, जिल्हा कार्यकारणी सदस्य संतोष सतदिवे आदींनी केले आहे.



# महिला संरक्षणासाठी 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करणे बंधनकारक

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्ह्यातील सर्व व्यापारी आस्थापना व खासगी व्यावसायिकांनी कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ नुसार ज्या आस्थापनेत १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असतील, त्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती (Internal Complaints Committee) स्थापणे बंधनकारक असून सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करुन डक्ए ड्ढु पोर्टलवर अपलोड करावी. त्याची प्रत कामगार उपआयुक्त कार्यालय, मालजीपूरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवावी किंवा कार्यालयाच्या ई-मेलवर पाठवावी: वूश्ररर्लेी-रलरवसारळश्र.ले असे आवाहन कामगार उपआयुक्त यांनी केले आहे.

अशी करा समिती स्थापन

समितीच्या अध्यक्षपदी वरिष्ठ महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. इतर सदस्यांमध्ये महिलांविषयक प्रश्नांवर कार्याचा अनुभव असलेले किंवा कायद्याचे ज्ञान असलेले सदस्य नेमावेत. तसेच समितीतील एकूण सदस्यांपैकी किमान ५० टक्के सदस्य महिला असणे आवश्यक आहे. महिला कर्मचाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीवर अधिनियमानुसार चौकशी करण्याची जबाबदारी समितीची राहील.

५० हजार रुपये दंड

जिल्ह्यातील १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांनी तात्काळ अंतर्गत तक्रार समिती स्थापन करून तिची माहिती महिला व बालविकास मंत्रालयाच्या डक्ए ड्ढु पोर्टलवर अपलोड करावी. समिती स्थापन न केल्यास अधिनियमाच्या कलम २६ नुसार संबंधित आस्थापना मालकास ५० हजार रुपयां पर्यंत दंडाची तरतूद आहे. तसेच हा प्रकार पुन्हा घडल्यास संबंधित आस्थापनेचा परवाना/नोंदणी रद्द करून दुप्पट दंड आकारण्याचीही तरतूद आहे. याबाबत सर्व व्यापारी व व्यावसायिकांनी नोंद घ्यावी.

डक्ए ड्ढु पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक

डक्ए ड्ढु पोर्टलवर माहिती भरल्यानंतर त्याची प्रत कामगार उपआयुक्त कार्यालय, मालजीपूरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवावी किंवा कार्यालयाच्या ई-मेलवर पाठवावी: dy-labourabadgmail.com असे आवाहन कामगार उपआयुक्त यांनी केले आहे.

# नव वर्षानिमित्त प्रत्येक कार्यालयाने संकल्प करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयाने आपापल्या कार्यालयामार्फत येत्या नववर्षापासून लोकाभिमुख उपक्रम राबविण्याचा संपर्क करा, तसेच जिल्ह्यामध्ये उद्योग, कृषी आणि पायाभूत सुविधा विकासांसह विकास कामे राबवली जात आहेत. सर्व विभागांच्या अधिनस्त जिल्हा व तालुकास्तरीय कार्यालमांनी समन्वय साधून काम करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सर्व शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांची समन्वय बैठक घेण्यात आली. , जिल्हा पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड,अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, कार्यालय प्रमुख या बैठकीस उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, कृषी विभाग अंतर्गत शेतकऱ्यांना पीक विमा, ग्रीस्टॅक नोंदणी, त्याचप्रमाणे फार्मर आयडी आणि नुकसान भरपाई प्रक्रिया या साठी विविध विभागांचा समन्वय आवश्यक आहे. या सर्व विभागांनी समन्वय साधून वेळेत काम करणे अपेक्षित आहे.औद्योगिक विकास आणि पायाभूत सुविधांच्या विकास प्रकल्पामध्ये उद्योग, महसूल, पोलीस व विविध कार्यालयांचा समन्वय आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी दोन किंवा दोनापेक्षा अधिक विभागांचा सहभाग असतो. या शिवाय प्रत्येक शासकीय कार्यालयात कर्मचारी अधिकारी यांनी वेळेत येणे,कार्यालयीन शिस्त पाळणे, कामाची कालमर्यादा पाळणे, वेळेत तक्रारीचा निपटारा करणे याबाबींवरही सर्वांनी लक्ष द्यावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी खर्च करण्याचे नियोजन करावे. मंजूर झालेला निधी समर्पित करावा लागणार नाही याची खबरदारी प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी घ्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# आमदार प्रशांत बंब यांच्या विषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या शिक्षक भोयर विरुद्ध गुन्हा दाखल करा; भाजपा खुलताबाद ची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी**/ गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या विषयी बेताल वक्तव्य करून अपशब्द वापरणारे अमरावती येथील शिक्षक चंद्रशेखर भोयर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून तत्काळ कारवाई करावी या मागणीचे निवेदन खुलताबाद तालुका भारतीय जनता पार्टीचे वतीने मंगळवारी तहसिलदार खुलताबाद, व पोलीस निरीक्षक खुलताबाद यांना देण्यात आले. दरम्यान मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

मंगळवार दि. ९ रोजी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते,नेते व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत गंगापुर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांच्यावर सोशल मीडियावर बेताल वकत्व्यावरून अपशब्द वापरणारे अमरावती येथील शिक्षक चंद्रशेखर भोयर यांचा जाहीर निषेध करण्यात आला व निवेदन देण्यात आले.

देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आमदार प्रशांत बंब यांचा सोशल माध्यमांवरील शिक्षक टी.इ.टी. संदर्भातील व्हिडीओ टॅग करून काळे फासण्याचे बेताल वक्तव्य चंद्रशेखर म. भोयर. २०, संत गाडगेबाबा व्यापारी संकुल, संत ज्ञानेश्वर सांस्कृतीक भवनचे बाजुला, मोर्शी रोड अमरावती. या शिक्षक संघटनेच्या हरामखोराने आमच्या तालुक्याचे आमदार प्रशांत बंब हे कामचुकार, मुख्यालयी न राहणारे आमच्या गरीबांच्या मुलांचे शैक्षणिक दृष्ट्या पिढ्या बरबाद करत असून त्यावर ते नेहमी आवाज उठवतात त्यामुळे आमच्या गंगापुर आणि खुलताबाद तालुक्यातील शिक्षक काही अंशी सुधरण्याचा प्रयत्न करत आहे. दि. ५ डिसेंबर रोजी काहि शिक्षक संघटनांनी छत्रपती संभाजीनगर येथे टी. ई. टी. घेण्यात येवु नये यासाठी मोर्चा काढण्यात आला होता. त्यावर आमदार बंब यांना लासुर स्टेशन येथे काहि पत्रकाराने शिक्षक टी.ई.टी. परीक्षा रद्द करण्यात याव्या या मागणीसाठी त्यांनी मोर्चा काढला आहे त्यावर तुमची भुमीका काय? यावर आमदार बंब म्हणाले की, जवळपास ७० टक्के शिक्षक लाडावलेले आहेत. त्यांनी जो काहि संप केलेला आहे. त्यांची फक्त वेतन कपातच न करता, त्यांच्यावर सस्पेंशनच्या ऑर्डर काढल्या पाहिजेत....

या आशयाचा तो व्हिडीओ असुन आमचे नेते जे ७० टक्के शिक्षकांविरोधात बोलले त्यास आमचे पुर्ण समर्थन आहे. परंतु आमच्या आमदारांच्या विरोधात काळे फासण्याची भाषा करणाऱ्या चंद्रशेखर भोयर रा. अमरावती. याच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात यावी. व आमदार बंब यांच्या विरोधात जी काही काळे फासण्याची भाषा केली आहे. त्या मुळे त्याचे विरुद्ध तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा व त्याने आमदार बंब यांची जाहीर माफी मागावी. अशी मागणी करण्यात आली आहे.



वेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,जिल्हा सरचिटणीस विकास कापसे,माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, माजी जि.प सदस्य एल.जी. गायकवाड,माजी सभापती गणेश आधने, दिनेश अंभोरे, नवनाथ बारगळ, सुरेश मारकड, शहर अध्यक्ष परसराम बारगळ, आशिष कुलकर्णी, प्रशांत गदाणकर,योगेश बारगळ,सतीश दांडेकर, सोमीनाथ तुरेवाले, खिर्डीचे माजी सरपंच कृष्णा चव्हाण, अविनाश कुलकर्णी, सचिन चव्हाण, शिवाजी गायकवाड,संतोष राजपूत,राजेंद्र बढे, अरुण पाटे,संदिप निकम, बंडु शिंदे, बाळू नलावडे, विकीन हजारे, आनंद काटकर,वसंत शिरसाट, योगेश बारगळ,द्वारकादास जाधव, गोविंद काळे, शंकर, अंभोरे,संदीप आधाने, हरिदास म्हसकर, गुलाब कुचे, संभाजी श्रीखंडे, प्रेम राठोड, शुभम भागडे, नंदकुमार चव्हाण, गोरक्षनाथ बारगळ यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# पिशोर नाचनवेल चिंचोली लिं परिसरात रब्बी पेरणीला वेग

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम** / कन्नड तालुक्यात नाचनवेल पिशोर चिंचोली लिं करंजखेडा परीसरात गहू मका हरभरा खरीप पिकावर शेतकऱ्याचा जास्त भर खरीप हंगामात कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्याने रब्बी हंगामासाठी कापसाचे फडदर पीक न घेण्याचे आवाहन ऑक्टोबर आणि दिवाळीनंतर रखडलेल्या रब्बी पिकाने आता गती घेतली आहे. मका, हरभरा व गहू पेरणी उरकताना शेतकरी दिसून येत आहे. यंदा तालुक्यात रब्बी हंगामासाठी ४५ हजार १०६ हेक्टर क्षेत्र अपेक्षित आहे. पेरणीला उशीर झाल्याने ४ हजार ९०० हेक्टर क्षेत्रावर सुमारे ११ टक्के पेरणी झाली आहे. यामध्ये



कृषी विभागाकडून करण्यात आले.

यंदा अतिवृष्टीमुळे मका, सोयाबीन आणि कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले. अद्रक पिकांवर मर व कंद कुज रोग येऊन गेला तर कापूस पिकांची बोंडे सडल्याने उत्पादनात घट झाली. प्रामुख्याने हंगामी व आडसाली ऊस, शाळू ज्वारी, गहू, मका व हरभरा पिकांचा समावेश आहे. ओलीत क्षेत्रात आडसाली ऊस, गहू, मका, कांदा, कांदा बिजात्पोदन, उन्हाळी बाजरी पेरणीकरडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे

## पैठण एमआयडीसी पोलिस ठाण्यात काळी पिवळी,पे रिक्षा चालक,मालकांची बैठक...

# अपघात रोखण्यासाठी खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांना पोलिसांच्या सूचना.

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपळवाडी प्रतिनिधी// हारून शेख**/ पैठण तालुक्यातील पैठण ते छत्रपती संभाजी नगर रोड वरील ईसारवाडी शिवारात दि.(२) रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास धनगाव येथील मेगा फूड कंपनी घेऊन जाणाऱ्या पे रिक्षा व ट्रॅक्टर मध्ये झालेल्या अपघातात दोन महिला कामगारांचा मृत्यू झाला तर ईतर सात महिला गंभीररित्या जखमी झाल्याची घटना घडली होती. या अपघातातील रिक्षा चालकाची प्रकृती गंभीर असल्याने तो अद्यापही रुग्णालयात उपचार घेत आहे.परंतु इतका मोठा भीषण अपघात होऊनही या या परिसरातील काही रिक्षा चालक सकाळी,सकाळी आपल्या रिक्षात दहा ते बारा कंपनी कामगार तसेच शेतमजूर महिलांना आपल्या रिक्षात कोंबून,साउंड सिस्टम मधे मोठमोठ्या आवाजात गाणे लाऊन इतर गाड्यांना ओव्हरटेक करत भरधाव वेगाने त्या मजूर महिलांना आसपासच्या गावातील शेती काम किंवा कंपनीमध्ये पोहच करत असल्याच्या प्रकारात अधिकच वाढ झाल्याचे निदर्शनात येत आहे.त्यामुळे पैठण एम. आय. डी.सी पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन यापुढे खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे कोणत्याही प्रकारचा अपघात घडुन किंवा जीवित हानी होऊ नये या अनुषंगाने खबरदारी म्हणून आज सकाळी पोलिस ठाण्यात प्रवासी वाहतूक तसेच शेती मजूर,कंपनी कामगारांना कामावर पोहच करणाऱ्या काळी पिवळी (ट्रक्स) सर्व पे रिक्षा चालक व मालकांची बैठक बोलावली.वाहन चालकांच्या या बैठकीत त्यांनी चालकाने वाहन चालवताना वाहन चालकाने आपल्या वाहनात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवून वाहतूक करू नये. तसेच पे रिक्षा चालकाने आपल्या शेजारच्या सीटच्या बाजूला प्रवासी बसू नये. आपल्या वाहनात म्युझिक सिस्टम लाऊ नये.त्यासोबतच वाहन चालकांनी आपल्या वाहनाचे कागदपत्रे,परवाना इन्शुरन्स,पि यू सी तसेच गाडीचे फिटनेस प्रमाणपत्र जवळ ठेवावे.वाहन चालकाने अधिकृत थांब्या वरच आपले वाहन थांबवून प्रवासी घ्यावेत व उतरावे. रोडच्या मधोमध बाजूला,उभी करून रहदारीस अडचण निर्माण करू नये अशा अनेक सूचना केल्या.आणि या सुचनेनंतर ही कोणताही वाहन चालक आपल्या वाहनातून क्षमतेपेक्षा प्रवासी घेऊन जातांना किंवा जोरजोरात गाणी वाजवताना आढळून आल्यास त्यावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात येईल.याची सर्व वाहन चालकांनी दक्षता घ्यावी असे सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी सांगितले.यावेळी पोलिस कर्मचारी राहुल मोहतमल, रामेश्वर पंडीत हे हजर होते.




## संक्षिप्त

# बेपत्ता मुलाची माहिती कळविण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ महानुभाव आश्रम, बीड बायपास सातारा परिसर येथील सागर चेतन कपाटे हा १२ वर्षे वयाचा मुलगा बेपत्ता झाला आहे असे सातारा पोलीस ठाणे यांनी कळविले आहे. नोंदविलेल्या तक्रारीनुसार, हा मुलगा दि.३० नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते अडीच वाजेच्या दरम्यान दुकानात जाऊन येतो असे सांगून गेला तो परत आलाच नाही. तो बेपत्ता झाला असे फिर्याद पोलीस ठाणे सातारा पोलीस स्टेशन येथे नोंदवली आहे. बेपत्ता बालकाचे वर्णनः- नाव- सागर चेतन कपाटे, वय १२वर्षे, रंग - सावळा, उंची अंदाजे ४ फूट, बांधा - मध्यम, डोळे - काळे, चेहरा -गोल, केस - काळे, अंगात- लाल शर्ट व काळी पॅन्ट घातलेली वर्णनाचा मुलगा आढळल्यास त्वरीत पोलीस ठाणे सातारा येथे पोलीस उपनिरीक्षक रामकृष्ण काळे संपर्क क्रमांक - ९७०२९९९०९०, तसेच पोलीस ठाणे सातारा संपर्क क्रमांक - ०२४० - २२४०५६५ येथे संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# छत्रपती संभाजीनगर येथे 'जागेवर निवड संधी' रोजगार मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत आयोजित 'जागेवर निवड संधी' रोजगार मेळावा बुधवार दि.१० रोजी सकाळी १० ते दु.२ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती बसस्टँड रोड, मालजीपुरा, छत्रपती कौशल्य विकास राजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी सुरेश बहुरे यांनी केले आहे. या रोजगार मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर व पुणे जिल्ह्यातील नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. डिस्टील एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी प्रा. लि., एल. आय. सी. ऑफ इंडिया, चैतन्य इंडिया फिन क्रेडीट प्रा. लि. यांसारख्या प्रतिष्ठित नियोक्त्यांकडून एकूण सुमारे १६० रिक्त पदांसाठी भरती केली जाणार आहे. मेळाव्यासाठी डिप्लोमा (मेकॅनिकल/इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रॉनिक्स), आयटीआय (सर्व ट्रेड), एचएससी, एसएससी उत्तीर्ण उमेदवार पात्र असून विविध शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी विभागाच्या www.rojgar.mahasway-am.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्त पदांसाठी युजर आयडी आणि पासवर्डच्या सहाय्याने ऑनलाईन अर्ज करावा. तसेच ज्यांना ऑनलाईन अर्ज करणे शक्य नसल्यास बायोडाटाच्या ५ प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहता येईल. नोंदणी किंवा अर्ज करताना काही अडचण आल्यास उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत ०२४०-२९५४८५९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. छत्रपती संभाजीनगर यांनी पात्र उमेदवारांनी १० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता वेळेवर उपस्थित राहून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# पशुपालकांसाठी विविध योजना; लाभ घेण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये सन २०२४-२५ ते २०२६-२७ या कालावधीत दुग्ध विकास प्रकल्प टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश असून, ग्रामिण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्ततीसाठी नमूद विविध योजना राबविण्यात येत आहेत, पशुपालकांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. संजीव पाटील यांनी केले आहे.

**योजना**

१.५०टक्के अनुदानावर उच्च उत्पादन क्षमता असलेली १ गाय/ म्हैस वाटप.
२. ७५ टक्के अनुदानावर उच्च उत्पादन क्षमता असलेल्या भृणांचे प्रत्यारोपण केलेली गाभण कालवड वाटप.
३. २५ टक्के अनुदानावर प्रजनन पूरक खाद्य वाटप.
४.२५ टक्के अनुदानावर फॅट षरीं व ीपष वर्धक खाद्य पुरवठा.
५. ५० टक्के अनुदानावर कडबा कुट्टी यंत्र वाटप.
६.१०० टक्के अनुदानावर बहुवार्षिक चार पीके/ ठोंबे वाटप.
७.२५ टक्के अनुदानावर मुरघास वाटप.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त पशुपालकांनी www.vmddp.com या संकेतस्थळावर भेट देऊन online पद्धतीने अर्ज करावे असे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, छपत्रती संभाजीनगर यांनी केले आहे. तसेच योजनासंबंधी अधिक माहितीकरिता डॉ. संजीव पाटील, जिल्हा प्रकल्प अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना ९९७५२६९८३१ या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा,असेही कळविण्यात आले आहे.

# प्रत्येक कुटुंबाची माहिती मोबाईल पवर नोंदवून जनगणना केली जाईल -जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** जनगणना-२०२७ हा खुप महत्वाचा विषय आहे. भारताच्या इतिहासातील प्रचंड मोठा बदल आहे. जातीनिहाय जनगणना केली जाणार आहे. जनगणना ही एकाच टप्प्यात पार पडणार आहे. कोणतेही घर अथवा कुटुंब या जनगणनेतून सुटता कामा नये, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदेसह पालिकेतील अधिकाऱ्यांना मास्टर ट्रेनर्स म्हणून तयार करण्यात येणार आहे. ५ जानेवारीपर्यंत हाऊस लिस्टींग ब्लॉक तयार करावयाचा आहे. तसेच स्वत:च्या मोबाईलद्वारे प्रगणकाला प्रत्येक कुटुंबाची अचुक माहिती ही पवर नोंदवून जनगणना केली जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

भारताची जनगणना-२०२७ साठी प्राथमिक बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, तहसीलदार अनिल नव्हाते यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी प्रत्यक्ष तर सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी हे दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्ह्यातील जनगणना ही पुढील वर्षात केली जाणार आहे. यामध्ये ५ जानेवारी २०२६ पर्यंत हाऊस लिस्टींग ब्लॉक तयार करणे. दि.२० जानेवारीपर्यंत प्रगणकाची यादी तयार करण्यात येईल. १० जानेवारीपर्यंत मास्टर ट्रेनर्सची निश्चिती होईल. आणि दि.३१ जानेवारीपर्यंत फिल्ड ट्रेनर्स निश्चित केले जातील. अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिली.

प्रत्येक टप्प्यावर तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांनी पडताळणी करुन खात्री झाल्यानंतरच आपली स्वाक्षरी प्रपत्रावर करावी. जिल्हास्तरावरही मास्टर्स ट्रेनर्स निवडून यामध्ये ट्रेनिंग मुद्देसुद्द दिली जाणार आहे. डिजीटल जनगणना केली जाणार असून मे आणि जुनमध्ये हाऊस आयडेंटीफाय करुन त्यांना क्रमांक दिला जाणार आहे. जनगणनेसाठी तालुकास्तरावर कार्यक्षम व तंत्रस्नेही १० अधिकारी-कर्मचारी घेवून जनगणना २०२७ कक्ष स्थापन करावा जेणेकरुन भविष्यात समन्वय साधण्यास अडचण निर्माण होणार नाही. सहा प्रगणकामागे एक पर्यवेक्षकाची नेमणूक करावी लागणार आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी यावेळी बैठकीत सांगितले.



## संक्षिप्त

### जिल्ह्यातील पशुपालकांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** जालना जिल्ह्यात विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत पशुपालकांसाठी विविध योजना महाराष्ट्र शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये सन २०२४-२५ ते २०२७-२८ या कालावधीमध्ये दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पामध्ये जालना जिल्ह्याचा समावेश असून ग्रामीण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. ५० टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ दुधाळ गाय/म्हशीचे वाटप. ७५ टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ भृनाचे प्रत्यारोपण केलेली सात महिन्याची गाभण कालवड वाटप. २५ टक्के अनुदानावर प्रजनन पूरक खाद्य पुरवठा. २५ टक्के अनुदानावर फट व एसएनएफ वर्धक खाद्य पुरवठा. ५० टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र वाटप. २५ टक्के अनुदानावर मुरघास पुरवठा. १०० टक्के अनुदानावर सावर बहुवार्षिक चारा पिके घेण्यासाठी बियाणे/ठोंबे वाटप. तरी या योजनांचा लाभ घेण्याकरीता जास्तीत जास्त पशुपालकांनी ु.ीवव.िलै या संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जालना यांनी केले आहे. तसेच योजनांसंबंधी अधिक माहितीकरीता विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ चे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. विशाल जाधव जालना यांना ८६०५४५१८५० या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

### 'अमृत' संस्था देतेय प्रशिक्षण; व्याज परतावा योजनेचाही लाभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** जागतिक बाजारपेठेत व्यवसाय संधी वाढत आहेत. तरुण उद्योजकांना आयात-निर्यात व्यवसायाकडे वळवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य सरकारच्या स्वायत्त संस्थेकडून 'अमृत'च्या लक्ष्यित गटासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या, तसेच विद्यमान व्यवसायाचा विस्तार करू इच्छिणाऱ्या उद्योजकांसाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे. आयात-निर्यात क्षेत्रामध्ये रोजगार व उद्यमशीलतेच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे इच्छुक युवक-युवती, व्यापारी आणि उद्योजकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. या प्रशिक्षणामध्ये परदेशी व्यापार धोरणे, निर्यात कागदपत्रे, सीमाशुल्क प्रक्रिया, परदेशी बाजारपेठेची निवड, लॉजिस्टिक्स व्यवस्थापन, ऑनलाइन व्यापार तंत्रज्ञान तसेच विविध सरकारी योजनांचा लाभ अशा महत्त्वपूर्ण विषयांवर प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणार्थींना तज्ज्ञ मार्गदर्शन, उद्द्योग क्षेत्राशी नेटवर्किंग, व्यवसाय स्थापनेसाठी तांत्रिक साह्य अशा सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### करंजाळा येथे ऊसतोड कामगार व बालकांना हिवाळ्यात उबदार मदतीचा हात

**आत्ताच एक्सप्रेस**

**सुखापूरी प्रतिनिधी /** सध्या राज्यभर कडाक्याची थंडी पडत असून, अशा प्रतिकूल वातावरणात ऊसतोड कामगारांचे जगणे अधिकच कठीण होते. दिवसभर शेतात कष्ट करूनही त्यांच्या झोपड्यांमध्ये हिवाळ्यापासून बचावासाठी आवश्यक साधनांची कमतरता जाणवत असते. ही परिस्थिती लक्षात घेऊन हंस फाउंडेशनतर्फे करंजाळा येथे उबदार सेवा उपक्रम राबवण्यात आला.

उपक्रमांतर्गत प्रौढ ऊसतोड कामगारांना ब्लँकेट तर थंडीने त्रस्त लहान मुलांना स्वेटर वाटप करण्यात आले. वितरणावेळी महिलांचे, वृद्धांचे आणि बालकांचे समाधानाने उजळलेले चेहरे हा उपक्रमाचा सर्वात मोठा यशाचा क्षण ठरला.

हंस फाउंडेशन गेली अनेक वर्षे अंध, अपंग, निराधार, विधवा आणि ऊसतोड कुटुंबांसाठी विविध सेवा उपक्रम राबवत आहे. समाजातील कोणताही जीव थंडीने कापू नये या भावनेतून या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यासाठी दूरदूरवरच्या दानशूर नागरिकांनी आर्थिक सहाय्य, चादरी, ब्लँकेट, स्वेटर व विविध साहित्य स्वरूपात मनापासून मदत केली.

उपक्रमाच्या यशस्वीतेनंतर ऊसतोड कामगारांनी आणि गावकऱ्यांनी हंस फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी संस्थेचे माऊली दोबोले, महादेव शिंगटे, जालिंदर चोरमले, गोविंद कोळेकर, माजी सरपंच शिवाजी बाम्हणे, योगेश हेंद्रे, नीलकंठ नांद्रे आदी उपस्थित होते.



**प्रतिक्रिया -**

ऊसतोड कामगार आणि निराधार कुटुंबांकडे कडाक्याच्या थंडीपासून बचावासाठी कोणतेही साधन नसते. जेव्हा आम्ही त्यांच्यापर्यंत ब्लँकेट किंवा स्वेटर घेऊन पोहोचतो, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद हे कोणत्याही पैशाने विकत घेता न येणारे समाधान आहे. ही सेवा समाजातील दानशूर बांधवांच्या सहकार्यामुळेच शक्य झाली. त्यांच्या प्रत्येक मदतीबद्दल मनः पूर्वक आभार.

## केशवसृष्टी इरकॉन घनवनचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण

# पारसी टेकडी पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करणार - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** पारसी टेकडीला पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, या भागाचे सुशोभीकरण करून ते पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनविण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.



इरकॉन भोज कंपनीच्यावतीने पारसी टेकडी येथील घनवनात १००० वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्याचे लोकार्पण मंगळवार दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी व त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, केशव सृष्टी मुंबई संस्थेचे विश्वस्त निलकंठण अय्यर, उद्योजक रमेशभाई पटेल, सुनिल रायठ्ठा, शिवरतन मुंदडा, नितीन काबरा, गोविंद गोयल, राहूल अग्रवाल, डॉ. विठ्ठल पवार, डॉ. प्रकाश सिगेदार, सुरेश कुलकर्णी, हेमंत ठक्कर, यश पूरी, डॉ. आशुतोष सोनी, सचिन लोहीया, डॉ. रितेश अग्रवाल, चिराग तलरेजा, विष्णू पाटेकर यांच्यासह विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, पारसी टेकडी परिसरात नैसर्गिक सौंदर्य ऐतिहासिक महत्त्व असलेली ठिकाणे असल्याने येथे पर्यटनाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या ठिकाणाचा विकास झाल्यास रोजगार निर्मितीबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. परिसरात रस्ते, पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना, बसण्याची व्यवस्था, पार्किंग, कचरा व्यवस्थापन, सुरक्षा तसेच माहिती फलकांची उभारणी यांसारख्या मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. इरकॉन भोज कंपनीच्या वतीने पारसी टेकडी येथील घनवनात १००० वृक्षांचे संगोपन करण्याचे काम समस्त महाजन, कुंडलिका व सिना फाउंडेशन करणार आहे. केशवसृष्टी संस्थेने आतापर्यंत ६५ हजार वृक्ष पारसी टेकडीवर लावलेले असून ३.५ लाख वृक्ष संवर्धित होत आहेत.

लोकसहभागातून पारसी टेकडीवर वृक्षारोपण वृक्षसंवर्धन कार्य सुरू असून विविध सामाजिक संस्था, उद्योग समूह सक्रियपणे येथे योगदान देत आहेत. केशवसृष्टी संस्थेचे निलकंठण अय्यर यांचे जालना शहरवासियांच्यावतीने आभार व्यक्त करत विशेष सत्कार करण्यात आला.

## आपल्याला नको वाटणाऱ्या गोष्टी आपल्यासोबत घडत असतील तर मुलींनी व्यक्त व्हावे-भांडेकर

### नळविहीरा जिल्हा परिषद शाळेत पोक्सो कायद्यांतर्गत मार्गदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफ्राबाद प्रतिनिधी/** आपल्याला नको वाटणाऱ्या गोष्टी आपल्यासोबत घडत असतील तर मुलींनी व्यक्त व्हावे असे प्रतिपादन पोलिस कॉन्स्टेबल गहेरवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलतांना श्रीमती भांडेकर म्हणाल्या की सर्वच क्षेत्रात मुलींना संधी असून उच्च शिक्षण घेऊन आपली ध्येय साध्य करावे.गुड टच,



वसुंधरा भांडेकर यांनी केले. नळविहिरा येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित बालविवाह जनजागृती आणि पोक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन शिबिरात त्या बोलत होत्या.यावेळी मुख्याध्यापक शिवहरी नागरे, पोलिस जमादार नारायण गिराम, दत्तू मुनेमाणिक, सुनील अंभोरे,विनोद कळंबे, ज्ञानेश्वर झगरे, मंजुषा बकतकार, पूजा बॅड टच विषयी त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना माहिती दिली.यावेळी मुलींनी त्यांना भविष्यात पोलिस बनण्याची इच्छा व्यक्त केली. पोलीस भरती साठी काय तयारी करावी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पूजा गहेरवाल, सूत्रसंचलन ज्ञानेश्वर झगरे तर आभार मंजुषा बकतकार यांनी केले.

## टीईटी सक्तीविरोधात शिक्षकांत संताप; सेवेत असणाऱ्या शिक्षकांना अन्यायकारक अट का? - विनोद कळंबे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफ्राबाद प्रतिनिधी/** सेवेत प्रविष्ट होताना आवश्यक असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) सध्या सेवेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना अनिवार्य करण्याचा प्रयत्न सुरू असून, यामागे राज्यातील अनेक अनुभवी शिक्षकांना सेवेतून दूर करण्याचा डाव आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जाफ्राबाद तालुकाध्यक्ष विनोद कळंबे यांनी केला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळंबे यांनी म्हटले आहे की, न्यायालयाचा हवाला देत २५-३० वर्षांपूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांच्या मानगुटीवर टीईटीची सक्ती लादली जात आहे. कोणत्याही इतर कर्मचारी संवर्गावर सेवा सुरू असताना अशापद्धतीची परीक्षा बंधनकारक नाही; मग केवळ शिक्षकांवरच हा अट्टाहास का? असा त्यांनी संतप्त सवाल उपस्थित केला आहे. शिक्षक संघाचे आधारस्तंभ संभाजी तात्या थोरात आणि राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यातील खासदारांना निवेदन देऊन हा अन्याय संसदेत मांडण्याची मागणी करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील सर्व आमदारांनाही निवेदन देऊन विधिमंडळात आवाज उठविण्याचा आग्रह धरण्यात येणार असल्याची माहितीही कळंबे यांनी दिली. राज्य सरकार शिक्षक वर्गाला जाणीवपूर्वक डिवचत असून, येणाऱ्या पदवीधर, शिक्षक तसेच जिल्हा परिषद-महानगरपालिका निवडणुकांत शिक्षक आपली ताकद दाखवतील , असा इशाराही त्यांनी दिला.



## ताड हादगावमध्ये हरीनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता; काल्याच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर दुमदुमला

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड तालुका प्रतिनिधी /** गुरुपरंपरेचा गौरव आणि अध्यात्मिक ऊर्जा यांचा अनोखा संगम अनुभवत अंबड तालुक्यातील ताड हादगाव येथे २ ते ९ डिसेंबर २०२५ या कालावधीत भव्य अखंड हरीनाम सप्ताह तसेच परमपूज्य सद्गुरू विश्वरानंद महाराज व सचितानंद महाराज पुण्यतीर्थ सोहळा अत्यंत श्रद्धाभावाने संपन्न झाला.

गेल्या आठ दिवसांपासून गावात भक्तिरसाचा झरा अखंड वाहत होता. विविध भागांतून आगमन केलेल्या नामवंत महाराजांनी दररोज प्रभावी कीर्तन, प्रवचन आणि अध्यात्मिक प्रबोधन करत भाविकांच्या मनाला स्पर्श केला. संपूर्ण सप्ताहात गावात शांतता, समाधान आणि हरिनामाचा गजर अखंड घुमत राहिला.





**सांगता सोहळ्यात भागवत महाराजांचे हृदयस्पर्शी कीर्तन**

सप्ताहाचा शेवटचा दिवस भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.ह.भ.प. भागवत महाराज काळबाडे यांनी सादर केलेल्या काल्याच्या कीर्तनाने सभामंडप थरथरून गेला.त्यांच्या ओजस्वी व भावपूर्ण वाणीने 'रामकृष्ण हरी'चा गजर इतका रंगला की क्षणभर संपूर्ण परिसर अध्यात्माने भारून गेला. उपस्थित भाविकांनीही भक्तिभावाने उत्स्फूर्त प्रतिसाद देत वातावरण दुमदुमून सोडले.

**आत्मानंद स्वामींच्या मार्गदर्शनाखाली आयोजन**

या संपूर्ण सप्ताहाचे मार्गदर्शन गुरू रामानंद स्वामी सरस्वती तुकाबाबा दत्त संस्थान, ताड हादगाव यांचे दत्तकपुत्र परमपूज्य आत्मानंद स्वामी महाराज यांनी केले. त्यांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनामुळे सप्ताहाला विशेष तेज लाभले. त्यांच्या उपदेशातून समाजात प्रेम, एकता, सेवा आणि सद्गुरूभक्ती यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

**मिरवणुकीत महिलांचा आणि बालिकांचा उत्स्फूर्त सहभाग**

सप्ताहादरम्यान काढण्यात आलेल्या पादुका मिरवणूक, दिंड्या आणि पारंपरिक कार्यक्रमांमध्ये गावातील महिला, युवती आणि बालिकांनी अतुलनीय सहभाग नोंदवला.

पारंपरिक वेशभूषेतील बालिका, हातात कलश, टाळ-चिपळ्या, फुलांची सजावट या सर्वामुळे मिरवणुकीला रंगतदार शोभा प्राप्त झाली. या दृश्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतलेच, शिवाय गावात अपूर्व आध्यात्मिक उर्जा निर्माण झाली.

**महाप्रसादाला भाविकांची गर्दी**

सांगता सोहळ्यानंतर भाविकांसाठी आयोजित महाप्रसादाला मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांनी एकदिलाने पुढाकार घेत उत्कृष्ट व्यवस्थापन केले.

भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने प्रसादाचा लाभ घेत वातावरण अधिक मंगलमय केले.

**गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम भव्यतेने पार**

संपूर्ण सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी ताड हादगावातील तरुण मंडळी, महिलाबळ तसेच ग्रामस्थांनी अतुलनीय सहकार्य केले.

त्यांच्या परिश्रम आणि भक्तिपूर्वक सेवेमुळे आठ दिवस गावात शांतता, आध्यात्मिक एकात्मता आणि भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

ताड हादगावात नुकतेच पार पडलेले हे आयोजन फक्त धार्मिक कार्यक्रम न ठरता गुरुभक्ती, संस्कृती आणि अध्यात्माचा भव्य उत्सव ठरला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813